जलकलह

चंद्रशेखर पुरंदरे

समुद्रकाठी किंवा समुद्रात असणाऱ्या राष्ट्रांच्या समुद्रातील अखत्यारीविषयी निश्चित आंतरराष्ट्रीय संकेत आहेत. त्यानुसार समुद्रावरची त्या देशाची हद्द कोठे संपते, आंतरराष्ट्रीय पाणी कोठे सुरू होते हे स्पष्ट होते. मासेमारीचे अधिकार, जहाजांच्या वाहतुकीवर नियंत्रण, समुद्राच्या तळाखालील नैसर्गिक संसाधने - खनिजे, तेल, वायू वगैरे - यावर त्या देशाचे त्याच्या अखत्यारीतील समुद्रावर हक्क असतात. या हक्कांवरून नजीकच्या देशांत बेबनाव होऊ नये म्हणून या सीमा आखण्यात आलेल्या आहेत. पण तसे क्वचित होते. एकतर या नियमांची सत्तेद्वारे अंमलबजावणी करणारी जागतिक संस्था नाही. दुसरे म्हणजे चीनसारखे काही देश या सीमांचे नियम अस्तित्वात येण्याआधीचा ऐतिहासिक हक्कांचा दाखला देतात.

चीनच्या दक्षिणेला लागून असणारा प्रशांत महासागराचा भाग दक्षिण चीन समुद्र म्हणून ओळखला जातो. त्याच्याशी चीन, ब्रुनाई, व्हिएतनाम, मलेशिया, सिंगापूर, तैवान व फिलिपिन्स हे देश संबंधित आहेत. यातील सिंगापूर सोडता प्रत्येक देशाशी सागरी सीमांवरून चीनचे वितंडवाद चालू आहेत. काही वादांनी आता हिंसेच्या धमकीपर्यंत गंभीर रूप धारण केले आहे. फेब्रुवारी १९९२ ला हा सगळा दक्षिण चीन समुद्र आपल्या मालकीचा असल्याचा दावा चीनने केला. त्याचा या सगळ्याच देशांनी तीव्र निषेध केला. मग फेब्रुवारी २०१२ ला असोसिएशन ऑफ साऊथ ईस्ट एशियन नेशन्स या संघटनेने या भागावरील चीनचे हक्क व इतरांचे हक्क ठरवण्याचे धोरण जाहीर केले. ते कागदावरच राहिले.

या समुद्राच्या तळाखाली वायू, तेल यांचे साठे आहेत तसेच मासेही मोठ्या प्रमाणावर आहेत. शिवाय जगातील व्यापारी जहाजांचा वाहतुकीचा हा प्रमुख मार्ग आहे. सुएझ, पनामा या कालव्यांहूनही अधिक वाहतूक यातून होते. त्यातील बरीचशी तेल नेणारी जहाजे असतात. गेल्या काही वर्षांतील वेगाने वाढणाऱ्या चीनच्या औद्योगिकीकरणाने त्या देशाची आयात तेलाची गरजही वाढत आहे. त्यामुळे अशा जहाजांच्या संख्येत भर पडत आहे. शिवाय तेथे अनेक खडक, निर्मनुष्य छोटी बेटेही आहेत. म्हणून मालकीहक्क हे संघर्षाचे प्रमुख कारण आहे.

आंतरराष्ट्रीय नियमांनुसार लगतच्या समुद्रावर प्रत्येक देशाचा हक्क सुमारे ३५० ते ४०० किलोमीटर्स असतो. चीन हे जुमानत नाही. त्याच्या मते त्याच्या सागरी सीमा ऐतिहासिक आहेत व ते नकाशे पुरावा मानले पाहिजेत. या ऐतिहासिक सीमा सध्याच्या आंतरराष्ट्रीय सीमांच्या बऱ्याच पुढे जातात. समजा, चीन आणि शेजारील देशातील सागरी तळ ८०० कि.मी. आहे, काही ठिकाणी ऐतिहासिक दाव्यानुसार चीनची सागरी सीमा ७-८०० किलोमीटर्स आहे. मग ते दुसऱ्या देशाच्या ३५०-४०० कि.मी. सीमेचे उल्लंघन होते. त्याला या देशांचा विरोध आहे. त्यावर उत्तर म्हणून चीन आता आपल्या ऐतिहासिक दाव्याच्या सीमेवर आरमारी नजर ठेवून आहे. या देशांचे मच्छिमार, त्यांच्या गस्त घालण्याच्या नौका यांच्याविरुद्ध चीनकडून हिंसक कारवायाही होतात.

६ फेब्रुवारीच्या न्यूयॉर्क टाइम्समध्ये फिलिपिन्सच्या अध्यक्षांनी मुलाखत दिली. उर्वरित जगाने चीनच्या या कारवायांना, भौगोलिक विस्तार वाढवण्याला आळा घालावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. जगाच्या सध्याच्या निष्क्रियेतची तुलना त्यांनी दुसऱ्या महायुद्धाआधीच्या पश्चिमेच्या निष्क्रितयेशी केली. तेव्हा जर्मनीने तेव्हाच्या चेकोस्लावाकियाचा काही भाग बळकावला होता. तिकडे दुर्लक्ष केल्यास जर्मनीची आक्रमक भूक तेवढ्यावर भागेल असा पश्चिमेचा अंदाज होता. मात्र परिणाम उलटा झाला. पुढच्या सहा महिन्यात हिटलरने बहुतेक चेकोस्लावाकिया पादाक्रांत केला. मग दुसरे महायुद्ध झाले. हीच परिस्थिती आज चीनला न रोखल्यास येईल असे त्यांचे मत आहे.

२०१२ साली चिनी आरमाराच्या आक्रमकतेपुढे फिलिपिन्सला एका छोट्या बेटावरचा हक्क सोडावा लागला होता. फिलिपिन्सचे लष्करी सामर्थ्य चीनच्या तुलनेत नगण्य आहे. तीच गोष्ट मलेशिया, व्हिएतनाम या इतर देशांची. व्हिएतनामचे स्वत:च्या सागरी हद्दीतील तेलउत्पादनही चीनला मंजूर नाही. ते भारताच्या सहकार्याने चालते. त्या संबंधात २०११ साली एक भारतीय नौका - ऐरावत - व्हिएतनामला चालली असताना चिनी आरमाराने तिला अटकाव केला. फिलिपिन्सच्या अध्यक्षांचे विधान या पार्श्वभूमीवर आहे.

आंतरराष्ट्रीय मुत्सद्दी परिभाषा मवाळ असते पण ही भाषा स्पष्ट आहे. त्यावरून प्रश्नाचे गांभीर्य लक्षात यावे.

जपानच्या पंतप्रधानांनीही चीनबाबत असेच उद्‌गार आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर जानेवारीमध्ये काढले. १९१४ पर्यंत ब्रिटन व जर्मनीचे आर्थिक संबंध चांगले होते. पण तरीही ते दोन्ही देश युद्धापर्यंत आले असा हवाला त्यांनी दिला. आज चीन-जपान व्यापारी संबंधही चांगले आहेत. त्याचा अर्थ युद्ध होणारच नाही

असा नाही, असा हा इशारा आहे. चीन-जपान दरम्यानचा समुद्र पूर्व चीन समुद्र म्हटला जातो. तेथील अनेक निर्मनुष्य बेटांवर दोन्ही देश ऐतिहासिक हक्क सांगतात. या बेटांना एक चिनी व दुसरे जपानी अशी दोन नावे असतात त्यामुळे त्या-त्या देशाचा दावा अधिकच बळकट होतो. चीन-जपानमध्ये इतरही ऐतिहासिक वैमनस्य आहे. या तणावामुळे जपानमध्ये वर्णद्वेषी अति-उजव्या शक्ती डोके वर काढत आहेत, ही चिंतेची बाब आहे.

फिलिपिन्स व जपान दोन्हीला अमेरिकेचे लष्करी संरक्षण आहे. वर उल्लेख केलेल्या फिलिपिन्सबरोबरच्या चीनच्या चकमकीत अमेरिकेने मध्यस्थी केली व दोन्ही देशांनी त्या वादग्रस्त बेटावरून माघार घ्यावी असा तोडगा काढला. त्यानुसार फिलिपिन्सने माघार घेतली पण चिनी बोटी तेथेच राहिल्या. म्हणजे, चीन अमेरिकेलाही दाद देत नाही हे उघड आहे. त्यात चीनला शह देण्यासाठी आपला एकूणच आशियातील प्रभाव वाढवण्याचा अमेरिकेचा प्रयत्न आहे. पण अमेरिकेला, विशेषत: लष्करी सवलती दिल्यास आपला देश अमेरिकेची वसाहत होईल अशीही भीती या देशांमध्ये आहे. विशेषत: फिलिपिन्समध्ये अशा अमेरिकन विस्ताराला अंतर्गत विरोध आहे.

त्यात चीनने नवीन दावा केला आहे. त्यानुसार चीन-दक्षिण कोरिया व जपान यामधील समुद्रावर हवाई देखरेख करण्याचा चीनचा हक्क आहे. त्यामुळे एरवी जपानच्या विरुद्ध असणारा दक्षिण कोरियाही चीनच्या विरोधात गेला आहे.

अशा वादांमध्ये नि:पक्षपाती म्हणून संयुक्त राष्ट्रसंघाचा हस्तक्षेपही चीनला नामंजूर असतो. संबंधित देश व चीन यांनी द्विपक्षीय वाटाघाटीतच हे प्रश्न सोडवावेत असा चीनचा आग्रह असतो. वस्तुत: त्या वाटाघाटीतून निष्पन्न होत नाही हे लक्षात आल्यावरच फिलिपिन्सने प्रश्न संयुक्त राष्ट्रसंघाकडे नेला व चीनने त्या वाटाघाटींवरच बहिष्कार टाकला. द्विपक्षीय वाटाघाटीत जपान सोडता बाकी सगळेच देश चीनच्या तुलनेत दुबळे आहेत. त्यांच्यावर चीन दडपण आणू शकतो व निर्णय आपल्याला सोईचा होईल हे पाहू शकतो. आर्थिक ताकद, लष्करी सामर्थ्य दोन्ही बाबत हे देश कमकुवत आहेत. त्यांच्या सार्वभौमत्वाची हमी कोण देणार हा प्रश्न आहे.

एप्रिलमध्ये ओबामामहाशयांचा जपान, मलेशिया, दक्षिण कोरिया व फिलिपिन्स असा दौरा आहे. त्यातून त्या देशांच्या अपेक्षा तर बऱ्याच आहेत, पण चीनबाबत अमेरिका फार काही ठोस पावले उचलण्याच्या परिस्थितीत दिसत नाही. त्याचे एक कारण म्हणजे वर उल्लेख केलेल्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या सागरी सीमा निश्चित करण्याच्या नियमावलीवर १६५ (चीनसकट) देशांनी आणि युरोपियन युनियनने मान्यतादर्शक सही केली आहे पण अमेरिकेने आजवर सहीच केलेली नाही! त्यामुळे 'शिकवणारे तुम्ही कोण?' हा प्रश्न अप्रत्यक्षपणे अशा वाटाघाटीत विचारला जाऊ शकतो. तेथे अमेरिकेला नैतिक अधिकार राहत नाही. सिंगापूरच्या अध्यक्षांनी मागील वर्षी म्हटले की, 'हे प्रश्न कधीही सुटणार नाही, त्यात दोन्ही पक्षांना तडजोडच करावी लागेल.' त्यात चीनपेक्षा इतरांना जास्त पडते घ्यावे लागेल असे दिसते.

E-mail - artnondeco@yahoo.co.uk
Website - www.art-non-deco.com